विशेष दरखास्त क्र. १२७/२००९
उस्मानाबाद बँक वि. अविनाश व इतर

**<u>आदेश नि.क्र. २९३ वर</u>**
(CNR No. MHLA050012192009)

या प्रकरणी ऋणको याच्या मालमत्तेच्या विक्री लिलावधारक अर्जदाराने न्यायालयात जमा असलेली लिलावापोटीची रक्कम परत मिळण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर धनको यांनी म्हणणे देऊन निवेदन केले आहे की, अर्जदाराच्या अर्जातील विनंतीप्रमाणे योग्य ते आदेश करण्यास हरकत नाही.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराच्या वकिलांचे म्हणणे असे की, ऋणको याची भुखंड मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करुन त्याची रक्कम धनकोला देण्याचे आदेश झाले होते. त्याप्रमाणे ऋणकोच्या मालमत्तेचा लिलाव झाला त्यामध्ये या अर्जदाराने सर्वात जास्त बोली लावल्यामुळे त्याला ती मालमत्ता देण्याचे आदेश झाले होते. त्यानुसार अर्जदाराने न्यायालयात रुपये ६,६०,०००/- जमा केले होते. परंतु आजपर्यंत त्या लिलावातील जमीनीचा ताबा अथवा विक्री प्रमाणपत्र अर्जदारास मिळालेले नाही. म्हणून त्याने न्यायालयात जमा केलेली रक्कम परत मिळावी अशी मागणी केली आहे.

४. प्रस्तुत अर्जदार चांगदेव निवृत्ती दहिफळे याने रक्कम परत मागितली आहे. धनकोच्या वकीलांनीही या अर्जास हरकत घेतलेली नाही व अर्जातील विनंतीप्रमाणे आदेश करण्याचे निवेदन केले आहे.

५. नि.क्र. ३०५ वर या अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश- XXI नियम ९० (१) प्रमाणे झालेला लिलाव रद्दबातल ठरवण्यासाठी अर्ज

दिलेला होता. त्या अर्जावर धनकोने अर्ज मंजूर करण्यास हरकत नाही असे म्हणणे दिले. त्यानुसार तो अर्ज मंजूर करुन नि.क्र. २६०, २६१ वरील लिलाव रद्दबातल केलेला आहे.

६. लिलाव झालेल्या भुखंडाच्या चतुःसिमा जुळत नसल्याचे व तो भुखंड अस्तित्वात नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीवेळी दिसून आल्याने अर्जदाराने लिलाव रद्द करुन रक्कम परत मागितलेली आहे. प्रस्तुत अर्जावर सहा. अधिक्षक यांनी दिलेल्या शे-यानुसार रक्कम रुपये ६,६०,०००/- या अर्जदाराने न्यायालयात जमा केले होते व ते सद्य स्थितीला मुदत ठेवीत ठेवण्यात आलेले आहे असे दिसून येते. नि.क्र. २६० व २६१ वरील लिलाव रद्दबातल झालेला असल्याने ही रक्कम प्रस्तुत अर्जदारास परत देणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

## आदेश

सहा. अधिक्षक यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मुदत ठेवीतील रक्कम रुपये ६,६०,०००/- अर्जदार चांगदेव निवृत्ती दहिफळे यास व्याजासह परत दयावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.03.28 16:43:21 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक २८/०३/२०२२.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.